Hostel
53/30/5/84.

SOCIAL WELFARE OFFICER
AURANGABAD
Receipt 30 MAY 1984
Initials

शासकीय मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सुविधामध्ये सुसूत्रता आणण्याबाबत.

महाराष्ट्र शासन.
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग.
शासन निर्णय क्रमांक बीसीएच १०८२/९०३८५/[३८]का. ३२.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १६मे १९८४.

वाचा :- संचालक, समाजकल्याण, विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक १डिसेंबर, १९८२ चे पत्र क्रमांक शाव/डे/१/८२-८३/२४९४.

शासन निर्णय :-

समाजकल्याण विभागाव्दारे महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहे चालविली जातात. त्या वसतिगृहामध्ये व्यवस्थापनात सूत्रता यावी व त्यात सुधारणा व्हावी या उद्देशाने शासनाने एक समिती नियुक्त केली होती, सदरहू समितीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या वेगवेगळ्या सुविधांचा काळजीपूर्वक अभ्यास करुन सविस्तर अहवाल शासनास सादर केलेला होता. हा अहवाल शासनाच्या विचाराधीन होता.

२. सदरहू अहवालावर सविस्तर विचार केल्यानंतर शासनाने खालील निर्णय घेतले आहेत.

अ] सध्या अस्तित्वात असलेली प्रवेश नियमावली रद्द करुन त्याऐवजी परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली नवीन नियमावली अंमलात आणावी.

ब] शासकीय वसतिगृहातून ज्या ठिकाणी सध्या ठेकेदारी भोजन पध्दत अस्तित्वात आहे ती यापुढे बंद करण्यात यावी त्याऐवजी

१] विभागीय स्तरावरील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना/विद्यार्थीनींना दरमहा निर्वाह भत्ता देण्यात यावा.

२] इतर ठिकाणी परिशिष्ट "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे शासनामार्फत नवीन "आहार प्रमाणानुसार " भोजन देण्यात यावे.

क] विद्यार्थ्यांना/विद्यार्थीनींना देण्यात येणा-या सुविधा सर्व स्तरावरील वसतिगृहातून परिशिष्ट "क" व "ड" मध्ये दर्शविल्याप्रमाणेच पुरविण्यात याव्यात.

6969
30/5/84

३] विभागीय स्तरावरील विद्यार्थ्यांना/विद्यार्थीनींना देण्यात येणारा "निर्वाह भत्ता" खालीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे :-

| | |
|---|---|
| अ] भोजन दुध व न्याहरी | रु. २२५/- [दरमहा दर विद्यार्थ्याला] |
| ब] शाळा व कॉलेजमध्ये जाण्या-येण्याकरीतां लागणारा वाहन खर्च अंगाधा व कपडयाचा साबण केशकर्तन व तेल याकरीतां. | रु. २५/- [दरमहा दर विद्यार्थ्याला] |
| क] अन्य बाबी व पूरक खर्च | रु. ५०/- [दरमहा दर विद्यार्थ्याला] |

ड] विभागीय स्तराव्यतिरिक्त इतर ठिकाणाच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी/विद्यार्थीनींनाही वर दर्शविलेल्या कलम "अ" "ब" मधील सुविधासाठी दर्शविण्यात आलेला "निर्वाह भत्ता" दरमहा रोख आगाऊ देण्यात यावा.

४] विभागीय स्तरावरील विद्यार्थी/विद्यार्थीनींना देण्यात येणारा "निर्वाह भत्ता" खालील अटीवर देण्यात यावा.

अ] वसतिगृहानजीकच्या स्टेट बँक अगर राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडले असावे.

ब] शाळा, कॉलेजमध्ये मागील महिन्यातील ८० टक्के उपस्थिती असल्याबाबतचा संस्था प्रमुखांचा दाखला विद्यार्थ्याने दरमहा १५ तारखेपर्यन्त वसतिगृह प्रमुखास सादर करावा. अभ्यासक्रम सुरु झाल्यापासूनचा पहिल्या दोन महिन्याचा दाखला देणे जरुरीचे नाही. मात्र तिसऱ्या महिन्यात मागील उपस्थितीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

क] ज्या महिन्याचा "भोजनभत्ता देय आहे त्याच्या मागील महिन्याची महाविद्यालयातील उपस्थिती विचारात घेण्यात यावी. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ८०टक्के किंवा जास्त असेल त्याला पूर्ण भोजन भत्ता देण्यात यावा. ज्याची उपस्थिती ८०टक्क्यापेक्षा कमी असेल त्याला उपस्थितीच्या प्रमाणात "भोजन भत्ता देण्यात यावा. उदा. विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के असेल तर त्याला फक्त ३/४ भोजनभत्ता देता येईल. विद्यार्थी आजारपणास्तव गैरहजर असेल तर वसतिगृह प्रमुखाने तसे प्रमाणपत्र देऊन त्याचा भोजनभत्ता देण्याची व्यवस्था करावी.

[६] सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर ४५०/८१/व्यय-११, दिनांक ५-५-१९८३ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ य. बा. वळवी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नासिक.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी वर्ग -१
सर्व समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी
महालेखापाल महाराष्ट्र १ व २ मुंबई, नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग [व्यय-११], मंत्रालय, मुंबई.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
व्यवस्थापक, मागासवर्ग शासकीय वसतिगृहे,
निवड नस्ती बीसीडब्ल्यू-४.

[ड] शिक्षण संस्था प्रमुखांनी प्रमाणपत्राबरोबरच विद्यार्थी/विद्यार्थिनींची प्रगती व वर्तन याबाबतचा देखील उल्लेख करावा. वसतिगृह प्रमुखांनी विद्यार्थी/विद्यार्थिनींचे दाखल्यानुसार वर्तन व प्रगती असमाधानकारक व आढळल्यास त्यांच्या पालकांना लेखी सूचना द्याव्यात व त्यानंतरही प्रगती न आढळल्यास त्याला वसतिगृहातून कमी करण्याबाबतचा अहवाल संबंधीत समाजकल्याण अधिकारी वर्ग १ यांचेकडे सादर करावा.

[ड] शाळा महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्थांना १० किंवा अधिक दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात येते तेंव्हा विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर झालेल्या तारखेनंतर फक्त एकच दिवस वसतिगृहात राहता येईल. अशा सुट्टीच्या काळात त्यांना निर्वाह भत्ता देता येणार नाही.

[फ] भारत सरकार मागासवर्गीय शिष्यवृत्तीस पात्र असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे/विद्यार्थिनींचे अर्ज वसतिगृह प्रमुखांनी भरून घ्यावेत व ते संबंधीत संस्थांकडे पाठविण्यात यावेत. सदर मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीतून शैक्षणिक संस्थांनी त्यांना देय असणारे सर्व शैक्षणिक शुल्क कापून घेऊन निर्वाह भत्त्यापोटी विद्यार्थ्यांना देय असणारी रक्कम शासकीय कोषागारात चलना व्दारे जमा करावी व वसतिगृह प्रमुखास त्याप्रमाणे कळवावे. सदर शैक्षणिक संस्था प्रमुख ही बाब पूर्ण करीत आहेत याबाबतची खात्री करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी वसतिगृह प्रमुखाची राहील. निर्वाह भत्त्यापोटी देय असणारी रक्कम दर महिन्याच्या २५ तारखेच्या आत वसतिगृह प्रमुखाने कोषागारात कॉन्टीजंट बीलावर [एम. टी. आर नंबर ३१] काढावी. सदर रकमेचा धनादेश महिन्याच्या शेवटच्या तारखेस प्रत्येक विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होईल अशा प्रकारे वटवावा.

[५] या प्रकरणातील येणारा खर्च "२८८-सामाजिक सुरक्षा व कल्याण-सी-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-एल-अनुसूचित जातीचे कल्याण-एक-शिक्षण[१]एल-एक [१] बी-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्यांतर्गत योजना[१] अनुसूचित जातीतील मुले व मुली यांच्याकरीता सरकारी वसतिगृहे करणे मागणी क्रमांक १५३" या अर्थशीर्षाखाली खर्ची घालून त्या खाली करण आलेल्या तरतूदीमधून भागवावा.

५] वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शाळा/ महाविद्यालय सुरु होण्यापूर्वीच्या अगोदरच्या दिवसापासून त्याची वार्षिक परिक्षा पूर्ण झाल्यानंतरच्या दिवसापर्यंत वसतिगृहात राहता येईल. परंतु सदर काळात शैक्षणिक संस्थांना १० दिवस अगर जास्त सुट्टी असेल तर त्या मुदतीत भोजन अगर भत्ता मिळणार नाही. वार्षिक परिक्षा संपल्यानंतर व पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या काळात जर कोणत्याही विद्यार्थ्यास शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांच्या शिफारशीनुसार वसतिगृहात रहाणे आवश्यक असेल तर समाजकल्याण अधिकारी, वर्ग १ यांचे लेखी परवानगीने तो/ ती वसतिगृहात राहू शकतील. परंतु हया काळात त्यांना भोजन अगर भत्ता मिळणार नाही.

६] खालील अटी पूर्ण करणारे विद्यार्थी/ विद्यार्थीनी वसतिगृहात प्रवेशास पात्र असतील.

अ] जे महाराष्ट्र राज्यातील अधिकृत रहिवाशी आहेत.

ब] जे अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या निमभटक्या जमातीपैकी व आर्थिक दृष्टया मागासलेले आहेत.

७] खालील विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रवेशपात्र ठरण्यांत येणार नाही.

अ] विभागीय स्तरावरील वसतिगृहात शालेय अभ्यासक्रम करीत असणा-या विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाह

ब] महाविद्यालयीन शिक्षण क्रमाच्या मध्यतरीच्या वर्गात [Intermediatory Stage] शिकत असलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींना कोणत्याही वसतिगृहात प्रवेश दिला जाणार नाही.

क] जर ते कोणत्याही नोकरीत असतील तर

ड] जर ते अर्धवेळ [पार्ट टाईम] अभ्यासक्रम करीत असतील तर

ई] जर ते परिक्षेत नापास झाले असतील अगर कोणत्याही कारणास्तव परिक्षेस बसले नसतील तर.

## प रि शि ष्ठ " अ"

### शासकीय मागासवर्गीय मुलामुलींचे वसतिगृह प्रवेशाची नियमावली.

१] प्रत्येक शासकीय वसतिगृहात त्या त्या वर्षी उपलब्ध असलेल्या रिक्त जागापैकी ५ टक्के जागा " विशेष वाव " म्हणून शासनामार्फत भरण्यांत येतील. प्रत्येक वर्षी उपलब्ध असलेल्या रिक्त जागापैकी ५ टक्के जागांची माहिती समाजकल्याण अधिकारी, वर्ग १ यांनी वसतिगृहनिहाय संचालक, समाज कल्याण यांना १५ जुलै पूर्वी कळविली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत शासनाचे आदेश होईतोपर्यंत त्या जागा भरता येणार नाहीत.

२] शासकीय वसतिगृहात रिक्त असलेल्या वरील पाच टक्के जागाशिवाय इतरजागासाठी प्रवेश देण्याचे अधिकार समाज कल्याण अधिकारी, वर्ग १, यांना राहतील. त्यांनी दिलेले प्रवेश नियमानुसार आहेत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेवर राहील. वसतिगृहात दिलेल्या प्रवेशांत जर नियमांचे उल्लंघन झाले असेल तर त्यास समाज कल्याण अधिकारी, वर्ग १, सर्वस्वी जबाबदार राहतील.

३] राज्यातील कोणत्याही भागातील विद्यार्थी /विद्यार्थीनींना कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश दिला जाईल.

४] समाज कल्याण विभागाव्दारे चालविण्यात येणाऱ्या शासकीय मागासवर्गीय मुलामुलींच्या वसतिगृहामध्ये नवयाने प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/ विद्यार्थीनींना प्रवेश अर्ज छापील आवेदनपत्रामध्ये [ सोबतच्या नमुन्याप्रमाणे ] संबंधीत वसतिगृहाचे गृहप्रमुख/ गृहपालाकडे खाली नमूद केलेल्या दिनांकाच्या आत पाठवावेत.

| | |
|---|---|
| १] माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी | १५ मे पूर्वी |
| २] महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी | ३० जूनपूर्वी अगर निकाल लागल्या पासून १५ दिवसाचे आत. |

उपरिनिर्दिष्ठ दिनांकानंतर आलेले प्रवेश अर्ज कोणत्याही सबबीवर स्विकारले जाणार नाहीत. तसेच अपूर्ण माहिती असलेले अर्ज देखील विचारात घेतले जाणार नाहीत.

...२...

९] वसतिगृहात असलेल्या जुन्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना मागील वर्षाच्या वार्षिक परिक्षात किमान शेकडा ४५ टक्के गुण मिळाले असतील तरच त्यांना पुन्हा प्रवेश दिला जाईल.

१०] प्रत्येक वसतिगृहात असलेल्या जागांची विभागणी खालील-प्रमाणे करण्यात यावी.

जिल्हा स्तरावरील वसतिगृहे :-

| | |
|---|---|
| अ] महाविद्यालयीन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी | ६० टक्के |
| ब] माध्यमिक शाळेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी | ४० टक्के |

विभागीय स्तरावरील वसतिगृहे :-

| | |
|---|---|
| अ] कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी | २० टक्के |
| ब] उच्च महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी | ८० टक्के |

टीप :-

वसतिगृह असलेल्या शहरात वेगवेगळे वैद्यकिय अभ्यासक्रम व अभियांत्रिकी पदवी, पदविकाचे अभ्यासक्रम आहेत अशा ठिकाणच्या वसतिगृहात प्रवेश घेवू इच्छिणा-या वरील शाखेच्या प्रथम वर्षासाठी सर्व पात्र [Eligible] विद्यार्थ्यांना त्यांच्या जाती/जमातीनुसार ठरविलेल्या टक्केवारीपैकी उपलब्ध जागेनुसार प्रवेश देण्यात यावा. मात्र असे विद्यार्थी स्थानिक नसावेत.
उपलब्ध जागा वरील शाखेच्या प्रवेशार्थींच्या संख्येपेक्षा कमी असतील तर गुणवत्तेनुसार प्रवेश द्यावा.

स्थानिक विद्यार्थी :-

स्थानिक विद्यार्थी म्हणजे ज्यांनी वसतिगृह असलेल्या शहराच्या [ महानगरपालिका अगर जोड महापालिका हद्द, नगरपालिकेची हद्द अगर गावाची हद्द ] हद्दीत पालकाचे घरी राहून अभ्यासक्रम पुरा

टीप :-

वैधकीय शाखेच्या विधार्थ्यांना ते संपूर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीत एकदाच अनुत्तीर्ण झाल्यास त्यांचा वसतिगृह प्रवेश एक टर्म पुढे चालू ठेवावा. उदा. द्वितीय एम.बी.बी.एस. ला अनुत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्याने जर पूर्वी प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. ला या संधीचा लाभ घेतला असेल तर त्याचा वसतिगृह प्रवेश रद्द करावा.

ई] जर ते माध्यमिक शाळेत आठव्या वर्गाचे खालील वर्गात शिक्षण घेत असतील तर -

अपवाद :-

अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी/विद्यार्थिनीचे बाबतीत जर ते माध्यमिक शाळेतील पाचवी व पुढील वर्गात असतील तरीही त्यांना प्रवेश देण्यांत येईल.

फ] जुन्या विद्यार्थी/विद्यार्थिनींना पुन्हा पुढील वर्षी प्रवेश देतेवेळी त्यांच्या मागील वर्षाच्या वसतिगृहातील वागणूकीबाबत वाईट शेरा असेल तर.

ह] जुने विद्यार्थी/ विद्यार्थिनींना मागील परिक्षेत ४५ टक्केपेक्षा कमी गुण मिळाले असतील तर

ळ] प्रवेशार्थी विद्यार्थ्याचे/विद्यार्थिनीचे पालक स्थानिक असल्यास.

अपवाद :-

उपरोक्त नियम "क" मांग, भंगी, कातकरी व माडीया गोंड या विद्यार्थी/विद्यार्थिनीचे बाबतीत लागू नाहीत.

श] ज्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी प्रवेश अर्जामध्ये दिलेली माहिती खोटी आढळल्यास त्यांचा प्रवेश रद्द करण्यांत येईल.

क्ष] ज्या विद्यार्थी/विद्यार्थिनीच्या पालकाचे मासिक उत्पन्न रु. १,०००/- [रु.एक हजार] पेक्षा जास्त आहे.

८] विद्यार्थी /विद्यार्थिनींची निवड सर्वस्वी त्यांच्या गुणवत्तेनुसार केली जाईल.

## परिशिष्ट "अ" चे सहपत्र

जिल्हावार जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी ठरविलेली **टक्केवारी.**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | विमुक्त जाती/ भटक्या जमाती |
|---|---|---|---|---|
| १. | विभागीय स्तरावरील वसतिगृह | ७४ | ३२ | १४ |
| २. | ठाणे | १४ | ८६ | -- |
| ३. | कुलाबा | ३८ | ६२ | -- |
| ४. | रत्नागिरी | ९० | -- | १० |
| ५. | सिंधुदुर्ग | -- | -- | -- |
| ६. | नाशिक (विभागीय स्तराव्यतिरिक्त) | २६ | ७४ | -- |
| ७. | धुळे | ११ | ८९ | -- |
| ८. | जळगांव | ४५ | ४१ | १४ |
| ९. | अहमदनगर | ५८ | ३१ | ११ |
| १०. | पुणे (विभागीय स्तराव्यतिरिक्त) | ६२ | २० | १८ |
| ११. | सातारा | ४९ | -- | --- |
| १२. | सांगली | ७९ | -- | २९ |
| १३. | सोलापूर | ७३ | -- | २५ |
| १४. | कोल्हापूर | ८२ | -- | १८ |
| १५. | औरंगाबाद (विभागीय स्तराव्यतिरिक्त.) | ७२ | १० | १८ |
| | जालना | -- | -- | -- |
| | परभणी | ६९ | ११ | १० |
| | बीड | ७५ | -- | २५ |
| | नांदेड | ६७ | १४ | १९ |
| | उस्मानाबाद | ८७ | -- | [illegible] |

..२..

११] प्रत्येक वसतिगृहात मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थी/विद्यार्थीनींना खालील टक्केवारीनुसार प्रवेश दिला जाईल.

अ] प्रत्येक वसतिगृहात क्षमतेनुसार असलेल्या जागांपैकी (Out of efective accommodation avaible) २० टक्के जागा आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींसाठी राखून ठेवाव्यांत.

ब] उरलेल्या जागा सोबत जोडलेल्या परिशिष्ठ "अ" च्या सहपत्रात जिल्हावार दर्शविलेल्या टक्केवारीनुसार भरण्यांत याव्यांत.

१२] विभागीय स्तरावरील सर्व वसतिगृहाचे प्रवेश अर्ज संबंधीत समाज कल्याण अधिकारी, वर्ग१, यांनी ठरवून दिलेल्या वसतिगृहातच मागविण्यांत यावेत. प्रवेशार्थीना त्याची आगाऊ सूचना देण्यात यावी.

१३] विभागीय स्तरावरील सर्व वसतिगृहासाठी मुलांची एकच गुणवत्ता यादी तयार करण्यांत यावी.

१४] उपरिनिर्दिष्ठ नियमांत कोणत्याही प्रकारची शिथीलता अथवा सूट देण्याचे सर्व अधिकार संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास पुणे/नाशिक यांचे सर्वस्वी स्वाधीन असून त्यांचा याबाब- तचा निर्णय अंतिम राहील.

---xx---

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | विमुक्त जाती/ भटक्या जमाती |
|---|---|---|---|---|
| २१. | लातूर | -- | -- | -- |
| २२. | बुलढाणा. | ७१ | १० | १९ |
| २३. | अकोला. | ६४ | ११ | २५ |
| २४. | अमरावती [विभागीय स्तराव्यतिरिक्त] | ५१ | ३७ | १२ |
| २५. | यवतमाळ | ३२ | ३९ | २९ |
| २६. | वर्धा | ५२ | ४८ | -- |
| २७. | नागपूर [विभागीय स्तराव्यतिरिक्त] | ७२ | २८ | -- |
| २८. | भंडारा | ५८ | ४२ | -- |
| २९. | चंद्रपूर | ४१ | ५९ | -- |
| ३०. | गडचिरोली | -- | -- | -- |

टीप:-

वरील टक्केवारीनुसार प्रवेश देतेवेळी खालील अटी काटेकोरपणे पाळण्यांत याव्यांत.

अ] अनुसूचित जाती/जमाती यापैकी कोणत्याही एका जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना/विद्यार्थीनींना ३० टक्क्यापेक्षा जास्त जागा देवू नयेत.

ब] अनुसूचित जातीच्या जागांच्या टक्केवारीपैकी मांग व भंगी जातीच्या विद्यार्थ्यांसाठी/विद्यार्थीनींसाठी खालीलप्रमाणे जागा राखून ठेवण्यांत याव्यांत.

| | |
|---|---|
| महानगरपालीका हद्दीत व "अ" वर्ग नगरपालीका हद्दीत | १४ टक्के. [मांग ७ टक्के भंगी ७ टक्के] |
| इतर ठिकाणी | १० टक्के [मांग ५ टक्के भंगी ५ टक्के] |

२९५/१२

## परिशिष्ट "ब"

## शैक्षणिक साहित्य

अ] पुस्तके :-

१] इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना फक्त क्रमिक पुस्तकेच खालील अटीवर पुरविण्यात यावीत.

[१.१] रु १५ पर्यंतची क्रमिक पुस्तके जास्त काळ टिकणारी नसल्यामुळे वर्ष अखेर परत घेवू नयेत.

[१.२] रु. १५ पेक्षा जास्त कींमतीची पुस्तके वर्ष अखेरीस वसतिगृह प्रमुखाकडे परत करण्यात यावीत.

[१.३] रु. ५० पेक्षा जास्त किंमतीची पुस्तके प्रत्येक तीन विद्यार्थ्यांच्या गटास एक प्रत या प्रमाणेच खरेदी करुन ती संस्थेच्या वाचनालयात ठेवण्यात यावीत व विद्यार्थ्यांना गरजेनुसार पुरविण्यात यावीत.

२] इयत्ता १२ वी च्या पुढील विद्यार्थ्यांना :-

[२.१] रु. १५ पर्यंतची क्रमिक पुस्तके जास्त काळ टिकणारी नसल्यामुळे वर्ष अखेर परत घेवू नयेत.

[२.२] रु. १५ पेक्षा अधिक परंतु रु. ५० पेर्यंत किमंतीची क्रमिक पुस्तके प्रत्येक विद्यार्थ्यांस पुरविण्यात यावीत व ही पुस्तके वर्ष अखेरीस वसतिगृह प्रमुखाकडे परत करण्यात यावीत.

[२.३] रु. ५० पेक्षा अधिक किंमतीची क्रमिक पुस्तके/संदर्भ पुस्तके शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांच्या शिफारशीनुसार खरेदी करण्यात यावीत, अशी पुस्तके प्रत्येक ३ विद्यार्थ्यांच्या गटासाठी एक प्रत हया प्रमाणेच खरेदी करावीत व ती संस्थेच्या वाचनालयात ठेवावीत. विद्यार्थ्यांना गरजेनुसार ती पुरविण्यात यावीत.

क) वर दर्शविलेल्या निर्धारीत टक्केवारीनुसार विद्यार्थी/विद्यार्थीनींचे पुरेसे अर्ज उपलब्ध झाले नसल्यास सदर जाती-जमातीच्या राखीव जागा संचालकांच्या पूर्व परवानगीने खालील दर्शविलेल्या जाती-जमातींच्या उपलब्ध प्रतिक्षा यादीतून भरण्यांत याव्यांत.

प्रथम प्राधान्य : मांग व भंगी

- नसल्यास -

व्दितीय प्राधान्य : भटक्या व विमुक्त जमाती.

- नसल्यास -

तृतिय प्राधान्य : अनुसूचित जमाती

- नसल्यास -

चतुर्थ प्राधान्य : अनुसूचित जाती

ड) संचालकांची पूर्व परवानगी घेण्यासाठी निर्धारीत टक्केवारीप्रमाणे जागा भरण्यासाठी करण्यांत आलेल्या प्रयत्नांचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

इ) संचालकांच्या पूर्व परवानगीनुसार एका गटातील जाती,जमातींच्या विद्यार्थी/विद्यार्थीनींनी भरल्यानंतर त्या विद्यार्थी/ विद्यार्थीनीस दिलेला प्रवेश पुढील वर्षी सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी ज्या गटात मोडत असेल त्या गटात रिक्त झालेल्या जागेवर त्याचा/तिचा प्रवेश चालू ठेवावा.

---xx-- -

खर्च रु. २५००/– पेक्षा अधिक करता येणार नाही. इतर साहित्यापैकी कोणतीही वैयक्तीक वस्तू रु. १५०/– पेक्षा जास्त किंमतीची नसावी.

वरील तिन्ही प्रकारातील इतर साहित्या–खाली पुरविण्यात आलेल्या रु. १००/– किंवा जास्त किंमतीच्या वस्तू विद्यार्थ्यांनि शैक्षणिक सत्राच्या अखेर वसतिगृह प्रमुखास परत कराव्यात.

ड] **गणवेष :–**

१] [illegible] शालेय शिक्षण घेणा–या विद्यार्थी/ विद्यार्थीनीसाठी संपूर्ण वर्षाकिरिता गणवेषाचे प्रत्येकी दोन संच प्राचार्यांच्या शिफारशीनुसार [एकूण रु ८०/– पर्यंत दोन्हीकरीता]

२] ॲप्रन [पांढरा कोट] वैद्यकीय अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी दोन एकूण रु १००/– पर्यंत दोन्हीकरिता [तीन वर्षाकरीता]

३] बॉयलर सूट अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यां–साठी – [illegible] अभ्यासक्रमाचे सुरुवातीला फक्त एकदाच एक सूट जास्तीत जास्त रु. ८५/– पर्यंत कॉलेज भांडारातून द्यावा.

४] लॅबोरेटरी ॲप्रन :– जास्तीत जास्त रु २५/– पर्यंत विज्ञान [illegible] विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण अभ्यासक्रमाकरीता प्रत्येकी एक कॉलेज भांडारातून द्यावा.

५] व्यायाम [illegible] शारिरीक शिक्षण [illegible] कॅनव्हास बूट व पायमोजे सहीत एक संच रु. ७५/– पर्यंत देण्यात यावा.

टीप :–

वरील साहित्य परत घेवू नये.

टीप :-

कोणतीही पुस्तके खरेदी करण्यापूर्वी संस्थेत शिल्लक असलेल्या सदर पुस्तकांचा साठा विचारात घेवूनच नविन खरेदी करण्यात यावीत. वरिष्ठ अधिका-यांकडे याबाबत मागणी करतांना शिल्लक असलेल्या साठ्याबाबत उल्लेख करणे आवश्यक आहे. याबाबत पुस्तके शिल्लक असतांना ही खरेदी केलीत असे आढळल्यास शासकीय पैशाचा अपव्यय केल्याबाबत संस्था प्रमुखास जबाबदार धरले जाईल.

ब] वहया व स्टेशनरी :-

वहया, कोरे कागद, प्रात्याक्षिक वहया, रजिस्टर्स, कंपास बॉक्स, कलर बॉक्स इ. साहित्य परिशिष्ठ "ब" दाखविल्या-प्रमाणे देण्यात यावे. साहित्य विद्यार्थ्यांना गरजेनुसार व शिक्षण संस्था प्रमुखांच्या शिफारशीनुसार द्यावे. हे साहित्य वर्ष पूर्ण झाल्यानंतर परत घेवू नये. हे वरील रु. ५० व त्याखालील किंमतीचे साहित्य सतत वापरल्यामुळे निरुपयोगी होते म्हणून परत घेण्यात येवू नये.

क] इतर साहित्य :-

१] वैद्यकीय शाखेसाठी संपूर्ण अभ्यासक्रमाच्या काळात इतर साहित्य उदा. स्टेथॉस्कोप वगैरेसाठी जास्तीत जास्त खर्च रु. शंभरापेक्षा अधिक करता येणार नाही.

२] अभियांत्रिकी पदवी आणि पदविका यांच्या संपूर्ण अभ्यासक्रमाच्या काळात इतर साहित्य उदा. ड्रॉईंग बोर्ड, वगैरेसाठी जास्ती जास्त खर्च रु. १००० पेक्षा जास्त करता येणार नाही. इतर साहित्यापैकी कोणतीही वैयक्तिक बाब रु. १५० पेक्षा जास्त किंमतीची नसावी.

३] कलानिकेतन या शाखेतील पदविका अगर पदविचा अभ्यासक्रम घेणारे जे चित्रकला, पेंटींग किंवा तत्सम अभ्यासक्रम पूर्ण करीत असतील अशा विद्यार्थ्यांसाठी प्रति वर्षी त्या त्या अभ्यासक्रमासाठी लागणारे इतर साहित्य उदा. रंग, ब्रश, कॅनव्हास बोर्ड वगैरेसाठी जास्तीत जास्त

## परिशिष्ठ "क"

वह्या स्टेशनरी :-

अ) इयत्ता १०वी साठी संपूर्ण वर्ष मराठीत ४२०० पेजेस.

ब) बाकी अभ्यासक्रमासाठी संपूर्ण वर्षाकरीता ३२०० पेजेस.

क) महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांना रजिस्टर्स, कागद वगैरे त्यांचे विभागाने प्रमाणित केले असल्यास त्याप्रमाणे.

ड) प्रात्यक्षिक वह्या, विद्यालय/महाविद्यालयाने प्रमाणित केल्याप्रमाणे.

इ) कंपास बॉक्स एक अभ्यासक्रमाचे सुरुवातीस फक्त एकदा.

फ) कलर बॉक्स एक अभ्यासक्रमाचे सुरुवातीस फक्त एकदा.

वरील कोणतेही साहित्य परत घेऊ नये.

२. वह्या व स्टेशनरीसाठी तांत्रिक, अभियांत्रिकी, वैद्यकीय वगैरे अभ्यासक्रमासाठी त्यांचे विभागाने प्रमाणित केलेल्या यादी प्रमाणे देण्यात यावे. सदर यादी वसतिगृह प्रमुखाने संबंधित संस्था प्रमुखाकडून मिळवावी.

ड] संकीर्ण :-

१] शैक्षणिक सहली :-

अभियांत्रिकी, भूगर्भशास्त्र, वनस्पतीशास्त्र व भूगोल या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक सहली सक्तीच्या असल्यास त्याकरीता प्रत्येक विद्यार्थ्यावर एका वर्षात जास्तीत जास्त रु. २०० पेक्षा अधिक खर्च करता येणार नाही.

२] रिपोर्टस :-

अभियांत्रिकी व समाजसेवा अभ्यासक्रमानुसार प्रोजेक्ट रिपोर्ट वा थेसीस आवश्यक असल्यास यासाठी शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांच्या शिफारशीनुसार जास्तीत जास्त रु १५०/- पेक्षा अधिक खर्च करता येणार नाही.

ई ] क्रीडा व्यवस्था :-

प्रत्येक वसतिगृहास शक्यतो स्वत:चे क्रिडांगण असावे. असल्यास तेथे सिंगलबार, डबलबार, व्हॉलीबॉल, चेस, रिंग व कॅरमबोर्ड इत्यादी खेळाचे साहित्य शक्यतो उपलब्ध करून द्यावे. यासाठी दर-वर्षी वसतिगृहास जास्तीत जास्त रु २००/- पर्यंत खर्च करता येईल.

फ] वैद्यकीय सुविधा :-

विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी वर्षातून एकदा जनरल हॉस्पीटलमधून करून घ्यावी. प्रत्येक वसतिगृहात प्रथमोपचाराची पेटी असावी. आजारी विद्यार्थ्यावर त्वरीत वैद्यकिय उपचार करावेत. सदर उपचार जनरल हॉस्पीटल मध्ये केला जावा. जनरल हॉस्पीटलमध्ये औषधे उपलब्ध नसल्यास बाहेरून औषध घ्यावयाचे असल्यास वसतिगृह प्रमुखास २० रुपयापर्यंत औषध खरेदी करता येतील. त्यापेक्षा जास्त खर्चाची औषधे समाज कल्याण अधिकारी वर्ग १ यांच्या पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाहीत.

## परिशिष्ट "5"

## आवश्यक साहित्याची यादी

ज्या वसतिगृहाला स्वतःची इमारत आहे व जेथे प्रत्येक विद्यार्थ्यामागे ४० चौरस फूट जागा उपलब्ध आहे अशा वसतिगृहातून विद्यार्थ्यांना खालील प्रमाणात जरूरीनुसार साहित्य उपलब्ध करून द्यावे. इतर ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार अति आवश्यक वस्तूच फक्त पुरविण्यात याव्यात.

| अ.क्र. | वस्तूचे नांव | आकार | नग | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १) | फर्निचर | | | |
| | अ) लोखंडी पलंग | ६×२.५ | एक | १० वर्षे |
| | ब) खुर्ची लोखंडी हात नसलेली | सर्वसाधारण आकाराची | एक | १० वर्षे |
| | क) लाकडी टेबल ड्रावरसहीत | ३×२ | एक | १० वर्षे |
| २) | बिछान्याचे साहित्य | | | |
| | अ) सतरंजी | ६×२.५ | एक | ५ वर्षे |
| | ब) गादी ( ७ किलो रुईची ) | ६×२.५ | एक | ५ वर्षे |
| | क) लोकरी ब्लँकेट | ५४×९० | एक | ५ वर्षे |
| | ड) उशी (दिड किलो रुईची) | " " १४×१२ | एक | २ वर्षे |
| | इ) चादर (बेडशिट) | " " ५४×९० | तीन | २ वर्षे एक वापरणे व एक धुण्यास व एक भांडारात ठेवणे. |
| | फ) उशीचा अभ्रा | " " १५×१३ | दोन | २ वर्षे, विद्यार्थ्यांना एक वापरा व एक भांडारात ठेवावा. |

......२.

समाजकल्याण अधिकारी, त्याबाबत पूर्ण चौकशी करून निर्णय घेतील.

ज) प्रत्येक वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रमाणात प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांच्या एका गटासाठी एक वर्तमानपत्र व दोन मासिके पुरविण्यात यावीत. त्यावर होणारा जास्तीत जास्त खर्च दरमहा रु. 30/- एका गटासाठी असावा.

News paper

झ) शिकवणी :-

आठवी, नववी, दहावीच्या वर्गात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना गणित, इंग्रजी व शास्त्र या विषयात सहामाही परिक्षेत ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण प्राप्त झाले असल्यास फक्त त्या त्या विषयासाठी शिकवणी लावण्यात यावी. ह्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे प्रत्येक विषय दररोज एक तास शिकविण्यासाठी दरमहा रु. १०/- पर्यन्त खर्च करण्याची परवानगी असावी.

कोणत्याही शाळेतील विद्यार्थ्यास दिलेले व परत करण्याचे साहित्य व पुस्तके वर्षाअखेरीस परत घेण्यात यावीत. विद्यार्थी साहित्य व पुस्तके परत न देता गेल्यास त्याबाबत त्यांच्या परिक्षेचा निकाल रोखून ठेवण्याबाबत महाविद्यालय, विद्यालय व विद्यापीठ यांना त्वरीत कळविण्यात यावे. याची लेखी समज पालकांना देखील देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत अशा विद्यार्थ्यास पुढील वर्षी प्रवेश देण्यात येवू नये.

## परिशिष्ट 'ड'

## आहाराचे प्रमाण

विभागीय स्तराव्यतिरिक्त इतर ठिकाणच्या शासकीय वसतिगृहातून शासनामार्फत भोजन व्यवस्था अमलात आणण्यात यावी. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भोजनामध्ये येणाऱ्या वेगवेगळ्या खाद्य पदार्थांचे प्रतिदिवशी ( दोन्ही वेळच्या जेवणाचे ) वापरावयाचे जास्तीत जास्त प्रमाण खालीलप्रमाणे असावे.

२. आहारासाठी खालील पदार्थाशिवाय इतर कोणतेही पदार्थ अगर विशेष अनुदान देता येणार नाही.

| अ.क्र. | वस्तूचे नाव | मुलांकरिता आकडे ग्रॅममध्ये | मुलींकरिता आकडे ग्रॅममध्ये |
|---|---|---|---|
| १. | गहू, ज्वारी, वा बाजरी | ४०० | ३०० |
| २. | तांदूळ | १०० | १०० |
| ३. | कडधान्य/डाळी | १३० | १३० |
| ४. | पालेभाज्या/फळभाज्या/कंदभाज्या | ३०० | २५० |
| ५. | साखर ( शिरा-भातासाठी/रोजच्यासाठी ) | २० | २० |
| ६. | गोडेतेल | ५० | ४० |
| ७. | वनस्पती तूप ( शिरा-भातासाठी ) | १५ | १५ |
| ८. | दूध | २०० मिली ली. | २०० मिली लि. |
| ९. | मटण, मासे किंवा अंडी (आठवड्यातून एकदा) | १२५ किंवा २ अंडी | १२५ किंवा २ अंडी |

| अ.क्र. | वस्तुचे नांव | आकार | नग | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| ३] | भांडी | | | |
| अ] | स्टीलचे कप्याचे ताट २०–२२ गेजचे [विभागीय स्तार सोडून] | १४" | एक | १५ वर्षे |
| ब] | स्टील पेला | ६" | एक | १५ वर्षे |
| क] | लोखंडी बादली | १६" | दोन | ३ वर्षे [एका खोलीत] |
| ४] | इतर साहित्य | | | |
| अ] | प्लास्टिक मग | ६" | एक | १वर्षे } एका खोलीत |
| ब] | कच-याची टोपली | १२" | एक | १वर्षे } एका खोलीत |
| क] | पिण्याचे पाण्यासाठी माठ [प्रयत्ेक पाच मुला/मुलींसाठी] | मध्यम आकाराचा | एक | १वर्षे } एका खोलीत |
| ड] | आरसा [प्रत्येक पाच मुला/मुलींसाठी] | १२"x१८" | एक | १० वर्षे |
| इ] | लोखंडी तिपाई [प्रत्येक पांच मुला/मुलींसाठी] | | एक | १० वर्षे |
| फ] | वसतिगृहासाठी मोठे घडयाळ. | | एक | --- |

| अ.क्र. | वस्तूचे नाव | मुलांकरिता | मुलींकरिता |
| --- | --- | --- | --- |
| | | गाऊडे ग्रेयमदये | |
| १०. | श्रृंगारपेटी | १५ | १५ |
| ११. | रवा ( महिन्यातून एकदा ) | ६० ( मुलांकरिता दाढी भादरणेऐवजी ) | ६० |
| १२. | मसाला | ४० | ४० |
| १३. | मीठ | २० | २० |
| १४. | इंधन | ८०० | ८०० |